ePaper

वर्ष - 7 । अंक - 4 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।रविवार दि. 30 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## भिवंडीत इमारत कोसळून तिघांचा मृत्यू; 10-12 जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती



### आतील पानांत


- 'राष्ट्रवादीचे वर्चस्व!
- अजित पवारांना धक्का!
- राज्यात भूकंप?


# बालेवाडी-बाणेर परिसरातील नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका!

### मेट्रोचे काम मोठ्या प्रमाणावर पूर्ण, बॅरिकेड हटविण्यास सुरुवात

।पुणे। प्रतिनिधी।

**हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावर पुणे मेट्रो मार्गिका तीनचे काम सुरू झाल्यापासून रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बॅरिकेड लावण्यात आले. त्यामुळे हे रस्ते अरुंद होऊन वाहतूककोंडी होऊ लागली. परंतु आता मेट्रोचे काम मोठ्या प्रमाणावर पार पडले आहे. त्यामुळे आता हळूहळू बॅरिकेड हटविण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे बालेवाडी-बाणेर परिसरातील नागरिकांची वाहतूक कोंडीतून काही प्रमाणात सुटका होणार आहे.**



बालेवाडी-बाणेरमध्ये खांबांची उभारणी पूर्ण झाली असून, वर गर्डर पडलेले आहेत आणि व्हायाडक्टचे काम झालेले आहे, तेथील बॅरिकेड काढून घेतले जात आहेत. यानुसार, बालेवाडी मैदान ते राम नदी परिसर आणि बाणेर फाटा ते अभिमानश्री या भागातील बॅरिकेड हटविण्यास सुरुवात झालेली आहे, त्यामुळे येथील नियमित रस्ते वाहतुकीला वेग आला असून, वाहतूक कोंडीपासूनही वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे.

मेट्रोच्या अवजड बांधकामाची बाधा रस्त्यावरील वाहतुकीला होऊ नये तसेच प्रवाशांची सुरक्षितता अबाधित राहावी यासाठी बॅरिकेड लावण्यात आले होते.

हिंजवडी ते शिवाजीनगर या २३.३ किमी मार्गावर काम सुरू झाल्यापासून हे बॅरिकेड लावण्यात आले आहेत.

गणेशखिंड रस्त्यावर कॉसमॉस बँक येथे बॅरिकेडची रुंदी काही मीटरने कमी करण्यात आली आहे. येथील खांबउभारणी आणि गर्डर काम पूर्ण होताच हे बॅरिकेडही हटविण्यात येणार आहेत. त्यामुळेही वाहतुकीला दिलासा मिळू शकेल.

### आयटी पार्कच्या माध्यमातून विकास

बॅरिकेड म्हणजे एरवी निव्वळ सिमेंट आणि स्टीलचा ठोकळा असतो. परंतु हिंजवडी मेट्रोच्या प्रत्येक बॅरिकेडवर विशेष काम केलेले आहे. पुणेकरांचे खास वैशिष्ट्य असणारी, कोपरखळी मारणारी पुणेरी पाटी, पुण्याचा सांस्कृतिक वारसा, पुणे विद्यापीठ, आयटी पार्कच्या माध्यमातून साधला जाणारा विकास या गोष्टी प्रकर्षाने लक्षवेधी ठरल्या आहेत. बॅरिकेडवरील पुणेरी पाटी वाहनचालकांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य फुलवणारी ठरली, अशी माहिती पुणे आयटीसिटी मेट्रो रेल लिमिटेडच्या व्यवसाय प्रमुख व संचालिका नेहा पंडित यांनी दिली.

# डुडूळगावमधील अंतर्गत रस्ते होणार 'चकाचक'

### आ. महेश लांडगे यांच्याहस्ते कामाचा शुभारंभ, स्थानिक नागरिक, सोसायटीधारकांमध्ये समाधान

।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।



डुडूळगाव आणि चऱ्होली परिसरातील अंतर्गत रस्त्यांच्या कामांना गती देण्यात आली असून, मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांच्या देखभाल दुरूस्तीसह, डांबरीकरणाच्या कामांचा धडाका सुरू आहे. त्यामुळे या भागातील रस्ते चकाचक होणार आहेत.भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीत डुडूळगाव येथील अंतर्गत रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी माजी महापौर नितीन काळजे, भाजपा कोशाध्यक्ष सचिन तापकीर, माजी नगरसेविका सुवर्णा बुर्डे यांच्यासह विकास बुर्डे, रमेश वहिले, योगेश तळेकर, सचिन तळेकर, बजरंग वहिले, स्वप्ना वहिले, वंदना आल्हाट यांच्यासह सोसायटींचे चेअरमन आणि पदाधिकारी उपस्थित होते. डुडूळगाव येथील ९ मीटर रस्त्याच्या कामाला सुरूवात करण्यात आली असून, मंगलम सोसायटी, सूमन सोसायटी आणि सभोवतालच्या परिसराला त्याचा फायदा होणार आहे.

> पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत समाविष्ट झाल्यापासून सुमारे २० वर्षे डुडूळगाव, चऱ्होली आदी गावांना पायाभूत सोयी-सुविधांपासून वंचित रहावे लागले. त्यामुळे महापालिका आणि विधानसभा निवडणुकीच्या काळात समाविष्ट गावांतील अंतर्गत रस्त्यांचे जाळे निर्माण करणे हा मुद्दा आम्ही अजेंड्यावर घेतला होता. भाजपा सत्ताकाळात अनेक रस्त्यांची कामे मार्गी लागली आहेत. आता शिंदे-फडणवीस सरकार आणि महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून मोशी-चिखली-चऱ्होली-डुडूळगाव असा 'रेसिडेन्सिअल कॉरिडॉर' विकसित होत आहे, याचे समाधान वाटते.
>
> - महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# मावळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीवर राष्ट्रवादीचे वर्चस्व!

## राष्ट्रवादीला 17 तर भाजपला मिळाली अवघी एक जागा

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**मावळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक पार पडली. मतमोजणी शनिवारी पार पडली. यात बाजार समितीवर राष्ट्रवादी प्रणित मविआ पॅनलने 18 पैकी 17 जागांवर दणदणीत विजय मिळविला. तर भाजपला अवघी एक जागा मिळाली. आगामी पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिका निवडणुकीची पूर्वतयारी म्हणून या निवडणुकीकडे पाहिले जात आहे. याच निवडणुकीवर आगामी काळातील निवडणुकीचे भविष्य ठरेल असा विश्वास आमदार सुनील शेळके यांनी व्यक्त केला.**

1) कृषि पंतसंस्था मतदारसंघात सर्वसाधारण (7 जागा) एकूण 643 मते अवैध 48 मते 1) दिलीप नामदेव ढोरे (351), 2) संभाजी आनंदराव शिंदे (343), 3) सुभाष रघुनाथ जाधव (350), 4) विलास सदाशिव मालपोटे (375), 5) बंडू दामू घोजगे (353),6)मारुती नाथा वाळुंज(340), 7) साईनाथ दत्तात्रय मांडेकर (350), 8) शत्रुघ्न रामभाऊ धनवे (219), 9) निलेश विष्णू मराठे (233),10) बंडू तुकाराम कदम (225), 11) सुभाष रामभाऊ देशमुख (230),12) विशाल बबनराव भांगरे (230),13) प्रसाद प्रकाश हुलावळे (238), 14) खंडू बाळाजी तिकोने (217), 15) सुनील तानाजी दाभाडे (002)

2) कृषि पतसंस्था महिला एकूण 643 मते अवैध 20 मते 1) सुप्रिया अनिल मालपोटे (370), 2) अंजली गोरख जांभुळकर (368), 3) कांचन सुभाष धामणकर (216), नंदाताई देवराम सातकर (256)

3) कृषि पतसंस्था ओबीसी अवैध मते 20, 1) शिवाजी चिंधु असवले(366), 2) एकनाथ नामदेव पोटफोडे (257),

4) कृषि पतसंस्था वि ज / विमुक्त जाती जमाती अवैध 33, (1 जागा) 1) नथु शंकर वाघमारे (371), जितेंद्र काशिनाथ परदेशी (10),शरद परशूराम साळुंखे (229)

5) ग्रामपंचायत सर्वसाधारण(2 जागा)एकूण मतदान 836 अवैध 21 मते,1) नामदेव नानाभाऊ शेलार (426),2) विक्रम प्रकाश कलवडे (456), योगेश गजानन राक्षे (399), शिवराम मारुती शिंदे (320)

6) ग्रामपंचायत अनुसूचित जाती जमाती अवैध 19 मते (1 जागा) विलास बबन मानकर (424), अंकुश ज्ञानदेव सोनवणे (393),7) ग्रामपंचायत आर्थिक दुर्बल अवैध 25 मते, (1 जागा) अमोल अरुण मोकाशी (497), अस्लम जमील शेख (314)

8) व्यापारी व आडते (2 जागा ) एकूण मते 101 अवैध मत 1
1) नामदेव ज्ञानेश्वर कोंडे (48),
2) भरत दशरथ टकले(50)
3) महेंद्र छगनलाल ओसवाल (39),
4) प्रकाश रामभाऊ देशमुख (36),
5) परशुराम कंकाराम मालपोटे (08),
6)नवनाथ पांडुरंग हारपुडे (16)

9) हमाल तोलारी (1 जागा) एकूण मते 10 सर्व मते वैध
1) शंकर अंतू वाजे (8),
2) हनुमंत ईश्वर मराठे (2)

मावळचे तहसीलदार निवडणूक निरीक्षक विक्रम देशमुख,





### शांततेत उत्तम नियोजनात मतमोजणी

निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक (MAVAL) शिवाजी घुले, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी महेंद्र नेहुल, मतमोजणी अधिकारी अशोक मारणे, प्रवीण धमाल, जितेंद्र विटकर, गंगाधर कोत्तावार, पोलीस निरीक्षक विलास भोसले व सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव पोलीस अंमलदार संजय सुपे, सुनील जावळे, शशिकांत खोपडे व बहुसंख्य पोलीस अंमलदारांनी निवडणूक शांततेत उत्तम नियोजनात पारदर्शक पद्धतीने मतमोजणी करून निकाल घोषित केला.

### भाजपला मोठा धक्का बसला

**भाजप प्रणित छत्रपती शिवाजी महाराज सर्व पक्षीय सहकार परिवर्तन पॅनलला 18 जागांपैकी व्यापारी आडते मतदार संघात नामदेव ज्ञानेश्वर कोंडे विजयी झाले. भाजपला 18 पैकी एकच जागा मिळाली.भाजपला या निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे. माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. आगामी काळात होणाऱ्या पंचायत समिती,जिल्हा परिषद,नगरपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिका निवडणुकात भाजपचे चित्र काय राहणार हे मावळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून स्पष्ट होत आहे.**

### आ. सुनील शेळके यांचा दावा

आ. सुनील शेळके यांचा दावा खरा ठरला. विकास कामांच्या जोरावरच जनतेचा विश्वास प्राप्त केला. 18 पैकी 17 जागा राष्ट्रवादी प्रणित मविआ पॅनलला मिळाल्याने पदाधिकारी व कार्यकर्ते यांचा जल्लोष व उत्साह वाढला.

# वळसे पाटलांनी उमेदवारी नाकारली, देवदत्त निकमांचं बंड

## विजय मिळवत इतिहास रचला,राष्ट्रवादीच्या उमेदवारालाच पाडलं

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

पुणे जिल्ह्यातील अत्यंत चुरशीच्या असलेल्या आंबेगाव तालुक्यातील मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत दिलीप वळसे पाटील यांचे कट्टर समर्थक असलेल्या देवदत्त निकम यांनी बंडखोरी केली होती. राष्ट्रवादीच्या पॅनलनं बाजी मारली पण देवदत्त निकम बंडखोरी करत विजयी होत जायंट किलर ठरले आहेत.

मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १८ जागांसाठी महाविकास आघाडी विरोधात शिवसेना-भाजप युतीने पॅनेल उभं केलं होता. मात्र, युतीच्या पॅनेलला दारुण पराभावाचा सामना करावा लागला आहे. या पूर्वी तीन जागा बिनविरोध निवडून आल्या होत्या. त्यामुळे फक्त पंधरा जागांसाठी निवडणूक लागली होती.

बाजार समितीचे माजी सभापती देवदत्त निकम यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अरुण हगवणे यांचा पराभव केला आहे. निकम यांच्या बंडखोरीमुळे मंचर बाजार समितीच्या निवडणुकी कडे संपुर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते. निकम हे माजी गृहमंत्री दिलीपराव वळसे पाटील यांचे विश्वासू कार्यकर्ते म्हणून संपूर्ण आंबेगाव तालुक्याला



त्यांची ओळख आहे.

बंडखोरीची राज्यभरात चर्चा...

दिलीप वळसे पाटील यांनी त्यांना भिमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्षपद तसेच लोकसभेची उमेदवारीही दिली होती. एक व्यक्ती एक पद असे राष्ट्रवादीत निर्णय झाल्याने नवीन चेहऱ्यांना संधी देत निकम यांचा पत्ता उमेदवारी यादीतून अखेरच्या क्षणी कापण्यात आला होता. त्यामुळे निकम यांनी केलेल्या बंडखोरीची आंबेगाव, पुण्यासह राज्यभरात चर्चा होती.

### भाजप आणि शिवसेनेच्या उमेदवारांचा पराभव

**निकम यांनी बंडखोरी करत उमेदवारी अर्ज भरला होता. त्यामुळे काही दिवसापासून वळसे पाटील आणि निकम यांच्यात आलबेल नसल्याच्या चर्चा रंगलेल्या पहायला मिळत होत्या. मात्र आजच्या निकालात बंडखोर असलेले देवदत्त निकम यांना विजयी यश मिळाले असून वळसे पाटील यांची सत्ता आली आहे. त्यामुळे आता येणाऱ्या काळात देवदत्त निकम काय निर्णय घेतात हे पाहणे आता महत्वाचे ठरणार आहे. दुसरीकडे दिलीप वळसे पाटील यांच्या पॅनलच्या विरोधात लढत देणाऱ्या भाजप आणि शिवसेनेच्या उमेदवारांचा मात्र पराभव झाला आहे.**

## हवेली बाजार समिती निवडणुक:

# अजित पवारांना धक्का!

**» राष्ट्रवादी काँग्रेसचा 'सुपडा साप', अण्णासाहेब मगर शेतकरी विकास आघाडीचा 13-2 असा एकतर्फी विजय**



।पुणे।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**हवेली कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीच्या निवडणुकीत राज्याचे विरोधी पक्षनेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या कट्टर समर्थकांचा पराभव झाला. जिल्हा परिषदचे माजी सदस्य प्रदीप कंद आणि विकास दांगट यांच्या अण्णासाहेब मगर शेतकरी विकास आघाडीने १३-२ असा विजय मिळवला आहे. पुणे जिल्ह्यातील हवेली बाजार समितीचा हा निकाल अजित पवार यांच्यासाठी धक्कादायक मानला जात आहे.**




हवेली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत १८ जागांसाठी ५७ उमेदवार रिंगणात उतरले होते. त्यापैकी १५ जागांवर आमने-सामने लढत झाली. २ जागा व्यापारी आणि आडते मतदार संघातून व १ जागा हमाल-मापाडी मतदार संघातून निवडून आली आहे. तब्बल २० वर्षांनंतर ही निवडणूक झाली. तसेच, राष्ट्रवादीतून विकास दांगट यांनी बंडखोरी केली. त्यांच्यावर पक्षाने हकालपट्टीची कारवाई केली. त्यामुळे या निवडणुकीत प्रचंड चूरस निर्माण झाली होती. तसेच, विरोधी पक्षनेते अजित पवार यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती.

दरम्यान, विरोधी पक्षनेते अजित पवार यांचे खंदे समर्थक आणि महाराष्ट्र केसरी राहुल काळभोर यांचा धक्कादायक पराभव झाला आहे. दुसरे उमेदवार तथा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शुक्राचार्य वांजळे यांचाही पराभव राष्ट्रवादीसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत अण्णासाहेब मगर पॅनल आणि अण्णासाहेब मगर शेतकरी विकास आघाडी यामध्ये लढत झाली. ७२.२९ टक्के इतके मतदान झाले होता. स्वारगेट येथील शिवशंकर सभागृह येथे मतमोजणी करण्यात आली. सेवा सहकारी संस्था गटातील ११ जागा, ग्रामपंचायात गटात ४, व्यापारी व आडते गटात २ आणि हमाल, मापाडी गटातील १ जागेसाठी उमेदवार निवडणूक लढले.

## विजयी उमेदवार पुढील प्रमाणे

**» सेवा सहकारी संस्था मतदार संघ :**

१- रोहिदास उंद्रे
२- नितीन दांगट
३- प्रकाश जगताप
४- प्रशांत काळभोर
५- राजाराम कांचन
६- दत्तात्रय पायगुडे
७- दिलीप काळभोर

**» सेवा सहकारी संस्था महिला राखीव :**

८- मनिषा हरपळे
९- सारिका हरगुडे

**» सेवा सहकारी संस्था इतर मागासवर्ग :**

१०- शशिकांत गायकवाड

**» सेवा सहकारी संस्था विमुक्त जाती/ भटक्या जमाती:**

११- लक्ष्मण केसकर

**» ग्रामपंचायत सदस्य सर्वसाधारण :**

१२- रामकृष्ण सातव
१३- सुदर्शन चौधरी

**» व्यापारी आडते मतदार संघ :**

१४- गणेश घुले
१५- अनिरुद्ध भोसले

**» ग्रामपंचायत सदस्य आर्थिकदृष्या दुर्बल घटक :**

१६- रविंद्र कंद

**» ग्रामपंचायत सदस्य अनुसूचित जाती/ जमाती :**

१७- नानासाहेब आबनावे

**» हमाल-मापाडी मतदार संघ :**

१८- संतोष नांगरे

## पिंपरी-चिंचवडकरांनी राष्ट्रवादीला नाकारले...

**» राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्यासह महाविकास आघाडीतील प्रमुख पदाधिकाऱ्यांची राष्ट्रवादी पुरस्कृत अण्णासाहेब मगर पॅनलच्या उमेदवारांच्या प्रचारात उडी घेतली होती. मात्र, पिंपरी-चिंचवडमधील सेवा सहकारी मतदार संघातील सुमारे १३१ मतदारांनी राष्ट्रवादीला नाकारल्याचे दिसून येत आहे. भाजपा पुरस्कृत पॅनलसाठी आमदार महेश लांडगे यांनी प्रचार केला. रावेत, चिखली, मोशी, डुडुळगाव, चऱ्होली, चोविसवाडी, निरगुडी आदी ठिकाणी प्रत्यक्ष भेटी-गाठी केल्या. त्याचा फायदा अण्णासाहेब मगर शेतकरी विकास आघाडीच्या उमेदवारांना झाला. आमदार लांडगे यांनी मतदान केंद्रावर प्रत्यक्ष भेटी दिल्या. भाजपा पुरस्कृत उमेदवारांच्या विजयासाठी सक्रीय पुढाकार घेतला. त्यामुळे पिंपरी-चिंचवडमधील सेवा सहकारी संस्था मतदार संघामध्ये अण्णासाहेब मगर शेतकरी विकास आघाडीचा दबदबा कायम राहिला.**

## संपादकीय »

# आनंदामागील ‘अर्थ’!

***भारतीय अर्थव्यवस्था मंदावणार आणि भारत ही जगात सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरणार या ‘आंतरराष्ट्रीय नाणेनिधी’ने एकाच दिवशी केलेल्या दोन विरोधाभासी आणि तरी संपूर्ण सत्य विधानांतील कोणते आपल्याकडे निवडले जाईल हे शेंबडे शाळकरी पोरदेखील सांगेल.***

जागतिक अर्थव्यवस्थेचा आढावा घेणारा नाणेनिधीचा अहवाल मंगळवारी प्रसृत झाला. त्यात भारताच्या अर्थगतीवर भाष्य असून पहिल्यांदाच आपला अर्थविकास सहा टक्क्यांची पातळीही गाठू शकणार नाही, असे म्हटले आहे. आपल्या अर्थगतीस देण्यात आलेले हे आजवरचे नीचांकी गुण! केंद्रीय आर्थिक पाहणीनुसार आगामी काळात आपला अर्थविकास वेग ६.५ टक्के असणे अपेक्षित आहे, आशियाई विकास बँक आणि आपलीच रिझर्व्ह बँक तो ६.४ टक्के असेल असे म्हणते, जागतिक बँकेच्या मते तो ६.३ टक्के इतका राहील, ‘स्टँडर्ड अँड पुअर’ही आंतरराष्ट्रीय आणि ‘इक्रा’ ही राष्ट्रीय पतमानांकन संस्था तो आणखी खाली ६ टक्क्यांवर आणते तर ‘ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक कोऑपरेशन अँड डेव्हलपमेंट’ म्हणजे ‘ओईसीडी’ या संघटनेच्या मते मात्र भारत जेमतेम ५.९ टक्के इतक्याच गतीने वाढू शकेल. याचा अर्थ बलाढ्य देशांची ‘ओईसीडी’ आणि नाणेनिधी या दोन्ही संघटनांचे भारत ६ टक्के विकास दर गाठू शकणार नाही यावर एकमत दिसते. याचा साधा अर्थ असा की २०१३-१४ नंतर भारताच्या अर्थविकासाची गाडी जी रुळावरून घसरली ती अद्यापही परत मार्गावर येण्याची चिन्हे नाहीत. तथापि या वास्तवाकडे दुर्लक्ष करून आपण अजूनही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था कसे आहोत याबद्दल केंद्र पातळीवर बडवल्या जाणाऱ्या नगाऱ्यांपासून स्थानिक पातळीवरील चिरक्या पिपाण्यांचाही जल्लोष सुरू असला तरी विरोधाभासाचा अर्थ लावणे आवश्यक ठरते.विकसित देशांचे दरडोई उत्पन्न ५० हजार डॉलरच्या पुढे, तर चीनचे १० हजार डॉलरच्या पुढे! जागतिक सरासरी चार हजार डॉलरच्या आसपास असताना आपण आज २,४०० डॉलरच्या पातळीवर आहोत. याचे कारण राष्ट्रीय उत्पन्नाला भाग दिला जातो, तो आपल्या १४२ कोटी लोकसंख्येने!याचे कारण आपण सहा टक्क्यांपेक्षाही खाली आलो असलो तरीही भारत जगातील सर्वात वेगवान अर्थव्यवस्था ठरतो हे विधानही तितकेच खरे आहे.

# व्यापार ‘जागतिक’ हवा की ‘आंतर’राष्ट्रीय?






ऐंशीच्या दशकातील नवउदारमतवादी घोडदौडीनंतर, जागतिक अर्थव्यवस्था स्थिर पायावर उभी करण्यासाठी, जागतिक बँक आणि नाणेनिधी यांच्या जोडीला ‘जागतिक व्यापार संघटना’ (‘जाव्यास’; वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन) हा ‘तिसरा स्तंभ’ १९९५ मध्ये उभा केला गेला. या स्थापनेत पुढाकार अर्थातच अमेरिका, युरोपीय समुदायाचा होता. २००१ मध्ये चीनने सभासदत्व घेतल्यानंतर ‘जाव्यास’ला एक वजन तर प्राप्त झालेच, पण त्यामुळे जागतिक व्यापारदेखील वाढला. १९९५ मध्ये वर्षात जागतिक व्यापार आणि जागतिक जीडीपीचे गुणोत्तर ४३ टक्के होते ते २००८ मध्ये ६० टक्क्यांवर पोहोचून आता २०२० च्या दशकात ५५ टक्क्यांच्या आसपास स्थिरावले आहे.

वर्गात शिस्त हवी म्हणून वर्गातील विद्यार्थ्यांनी एखादा मॉनिटर जरी निवडला तरी वर्गातील चारदोन आडदांड विद्यार्थ्यांनी मॉनिटरचा अधिकार मान्य केला असेल तरच काम सुकर होते. जाव्यास गेली २०-२५ वर्षे काम करू शकली कारण जगातील आर्थिक महासत्ता, प्रामुख्याने अमेरिका आणि चीनने जाव्यासचे ‘मॅन्डेट’ मान्य केले होते. जाव्यासला आवश्यक ते वित्तीय स्रोत पुरवले होते आणि कोणतेही ‘व्हेटो’ वापरले नव्हते. कारण जाव्यास असणे दोघांनाही लाभदायक ठरत होते. गेली काही वर्षे त्या परिस्थितीत झपाट्याने बदल होत आहेत.

जागतिक व्यापाराच्या चर्चेत एक महत्त्वाचा मुद्दा नजरेआड करता कामा नये. तो म्हणजे निखळ ‘व्यापारी’, शुद्ध ‘आर्थिक’ असे काही नसते. राष्ट्राराष्ट्रांतील आर्थिक/व्यापारी संबंधांना नेहमीच ऐतिहासिक, आयडियॉलॉजिकल, राजनैतिक, लष्करी, डेमोग्राफिक, भौगोलिक अशा अनेक गोष्टींमुळे आकार मिळत असतो आणि त्यात नाट्यपूर्ण बदलही होत असतात. अमेरिका-चीन संबंध वरील अनेक आघाड्यांवर ताणले जात आहेत. त्याच्या खोलात न जाता आपण इथे, अमेरिका-चीनमधील व्यापारी संबंधात तयार होत असलेले ताणतणाव जाव्यासच्या अस्तित्वाचा पायाच कसा उद्ध्वस्त करत आहेत, हे पाहू.

### अमेरिका-चीन तणाव आणि जाव्यास

जाव्यासच्या स्थापनेत आपण पुढाकार घेतला असला तरी तिच्याच नियमवहीमुळे आपल्या अर्थव्यवस्थेतील देशांतर्गत उत्पादन, रोजगारनिर्मिती यावर विपरीत परिणाम होत आहे याची जाहीर वाच्यता डोनाल्ड ट्रम्प २०१६ मध्ये अमेरिकन राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून करू लागले. चिनी मालावर आयात कर वाढवणे, आयातीवर निर्बंधच घालणे वगैरेतून ट्रम्प यांनी चीनविरुद्ध व्यापारयुद्ध छेडले. २०२० मध्ये जो बायडेन राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी स्वसंरक्षणात्मक धोरण अधिक दृढ केले आहे. बायडेन प्रशासनाने ‘इन्फ्लेशन रिडक्शन’ कायद्यांतर्गत अमेरिकन कंपन्यांना सबसिडी देणे, ‘चिप्स’ कायद्यांतर्गत अमेरिकन कंपन्यांना चीनला सेमिकंडक्टर तंत्रज्ञान विकण्यास बंदी घालणे सुरू आहे.

जाव्यासच्या नियमवहीनुसार राष्ट्राच्या सुरक्षिततेला धोका ठरू शकणाऱ्या कोणत्याही वस्तुमालाच्या मुक्त व्यापारास निर्बंध घालण्याची मुभा एखाद्या राष्ट्राला आहे. मात्र कोणती आयात/ निर्यात राष्ट्राच्या सुरक्षिततेला नक्की कशी धोका पोहोचवू शकेल हे सिद्ध करण्याची जबाबदारी निर्णय घेणाऱ्या राष्ट्रावर नाही. ही तरतूद खरे तर अनेक दशके आहे. पण ती न वापरण्याचे अलिखित सामंजस्य प्रमुख राष्ट्रांमध्ये होते. अमेरिकेने हल्लीच या तरतुदीआधारे, चीनकडून होणारी पोलाद/ ॲल्युमिनियम आयात रोखली. चीनने जाव्यासकडे तक्रार केली. जाव्यासचा आपल्याविरुद्ध गेलेला निवाडा अमेरिकेने ‘आमच्या देशाच्या सुरक्षिततेबद्दल बरेवाईट ठरवण्याचा अधिकार आम्ही कोणाहीकडे सुपूर्द करू शकत नाही’ असे सांगत धुडकावून लावला.

अमेरिकेत गेली अनेक दशके ‘युनायटेड स्टेट्स ट्रेड रिप्रेझेन्टेटिव्ह’ (यूएसटीआर) हे एक प्रस्थ होते.

**मित्रांनो, जीवन जगण्याचं प्रत्येकाचं एक तत्त्वज्ञान असतं. अगदी सामान्य माणसाचंही असतं. फारतर त्याला सांगता येणार नाही. प्रत्येकाची जाणीवपूर्वक अंगीकारलेली तत्त्वं असतात. माझी काही प्रिन्सिपल्स आहेत किंवा माझी काही VALUE SYSTEM आहे अशी विधानं आपण वारंवार ऐकतो. बारकाईनं अभ्यास केला असता हा तत्त्वांचा बडेजाव तकलादू, बेगडी असल्याचं स्पष्ट होतं. कारण सोयीनुसार ‘तत्त्वं’ सोडली जातात.**

# सामान्य-असामान्य : पुरुषाची ‘जात’



जातीपातीचं म्हणाल, तर आपण शिकलो सवरलो. ग्लोबल झालो; पण जातीपातीच्या झापडातून बाहेर पडत नाही. आपल्या डोक्यातून जात नाही ती जात! म्हणून आजच्या केसचं आडनाव नाही.

शरद लहानपणी एका तालुक्याच्या गावी राहत असे. आई-वडिलांचा एकुलता मुलगा. दुर्दैवानं वयाच्या आठव्या वर्षी वडिलांचं निधन झालं. आई अशिक्षित. एकत्र कुटुंब असल्यामुळे अन्न, वस्त्र, निवारा यांची सोय होती. आईनं लहानपणापासूनच घराण्याच्या परंपरा, कुलाचार, नीतिनियम, शिस्त यांचं बाळकडू पाजलं होतं. शरदला फार काळ एकत्र राहायचं नव्हतं. आईचे अपार कष्ट, हालअपेष्टा त्याला बोचत असत. स्वभाव अत्यंत मातृभक्त. वयाच्या सोळाव्या वर्षापासूनच छोटी छोटी कामं, नोकऱ्या करून कमाई आईच्या पायावर वाहत असे. बाविसाव्या वर्षी ग्रॅज्युएट झाला आणि चांगल्या बँकेत नोकरी मिळवली. आईला धन्य धन्य झालं. त्याच्या बँकेत एक सुस्वरूप, सालस, कष्टाळू मुलगी होती. दोघेही समान परिस्थितीत असल्यामुळे व रोजची गाठभेट असल्यामुळे सलगी वाढत गेली. तारुण्यसुलभ भावना जागृत होऊन घट्ट प्रेमात रूपांतर झालं. दोघं मेहनतीनं फुलवलेल्या संसाराची स्वप्नं रंगवत होते. आणाभाका झाल्या.

पण एक मुख्य अडचण होती. ती मुलगी त्यांच्या जातीची नव्हती. आईच्या परवानगीशिवाय लग्न होणार नव्हतं. बरेच महिने तगमग सहन केल्यानंतर त्यानं भीतभीतच आईकडे विषय काढला. त्या दोघींची भेट घडवून आणली. ती सालस, कष्टाळू मुलगी आईला सून म्हणून पसंत पडली. मात्र, तिचं आडनाव कळलं तेव्हा आईचं रूप पालटलं. सर्व गुणांवर जातीनं मात केली. आईनं अक्राळविक्राळ अवतार धारण केला आणि लग्नाला ठाम नकार दिला. शरदही इरेला पेटला. शरदच्या आईनं प्रभावी अस्त्र बाहेर काढलं. ‘हिच्याशी लग्न केलंस तर मी विष खाईन.’ या अस्त्रापुढे शरदनं हाय खाल्ली. लाडक्या मुलीला नकार देऊन कित्येक महिने तळमळत रडत काढले.

कडक धोरण स्वीकारून आपण आंतरजातीय विवाह टाळला, घराण्याची अब्रू वाचवली, तत्त्वं सांभाळली म्हणून आई खुशीत होत्या. शरद मात्र निराशेच्या खोल गर्तेत कोसळला.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज्यात भूकंप?

## कृषिमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले, मी मंत्री राहीन की नाही माहिती नाही...!

।नागपूर।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्यानंतर सध्याचं शिंदे फडणवीस सरकार कोसळणार, असे आरोप दररोज विरोधी पक्ष करतो आहे. तशी शक्यता अनेक नेते बोलून दाखवत आहेत. दरम्यानच्या काळात मुख्यमंत्री बदलाच्या चर्चांनी देखील जोर धरला होता. अशा सगळ्या चर्चा सुरु असताना कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी त्यांच्या आणि सरकारच्या भवितव्याबाबत मोठे विधान केले आहे. मी किती दिवस कृषिमंत्री राहीन, हेही मला माहीत नाही, असं म्हणून राज्यात भूकंप होणार असल्याच्या चर्चांना त्यांनी खतपाणीच घातलं. दुसरीकडे आज सकाळीच त्यांनी विखेंच्या मुख्यमंत्रिपदावर बोलताना मित्र मोठा झालेलं पाहायला आवडेल, असं वक्तव्य करुन मुख्यमंत्रिबदलाच्या चर्चांना हवा दिली होती.**



कृषिमंत्री सत्तार गुरुवारी नागपुरात पोहोचले. जिथे त्यांनी वनामतीत खरिपाच्या पेरणीसंदर्भात नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांची आढावा बैठक घेतली. या बैठकीत सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी सहभागी झाले. अधिकाऱ्यांना संबोधित करताना कृषिमंत्र्यांनी काही राजकीय विधाने केली. खासदार संजय राऊत यांनी शिंदे सरकारचे डेथ वॉरंट जारी झाल्याचा दावा केला होता. शिंदे-फडणवीस सरकारविरोधात डेथ वॉरंट जारी करण्यात आलंय. फक्त तारीख जाहीर व्हायची आहे, असं राऊत म्हणाले होते. योगायोगाने आज अब्दुल सत्तार यांनी आपल्या आणि सरकारच्या भविष्याविषयी मोठं विधान करुन सरकार बदलाच्या चर्चांना हवाच दिली आहे.

### शिंदे-फडणवीस सरकार पडणार ?

**» सत्तार यांचे हे वक्तव्य समोर आल्यानंतर शिंदे-फडणवीस सरकार पडणार की काय, अशा चर्चा पुन्हा सुरु झाल्या आहेत. कृषिमंत्र्यांच्या वक्तव्याचा संबंध राजकीय पंडितांकडून सुप्रीम कोर्टात शिंदे गटाच्या १६ आमदारांवरील आगामी निर्णयाशी जोडला जात आहे. सुप्रीम कोर्टाचा निर्णय आपल्या विरोधात येणार हे शिंदे गटाच्या आमदारांनीही मान्य केल्याची चर्चा यानिमित्ताने सुरु झाली आहे. का देखील त्यांनी मांडली.**

अधिकाऱ्यांना संबोधित करताना कृषिमंत्री म्हणाले, "प्रत्येक जिल्हादंडाधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांनी आपली जबाबदारी पार पाडत एकत्रितपणे काम करण्याचे ठरवले असून, शासनाची जी काही योजना आहे, ती अमलात आणायची आहे, ती होईलच. कृषी विभागाने केलेल्या कामांची माहिती घेतली आणि आम्ही काही उद्दिष्टे निश्चित केले आहेत. पुढच्या खरिपाच्या पेरणीच्या वेळी मी कृषिमंत्री राहिल की नाही याची शाश्वती नाही. पण तुम्ही अधिकारी राहाल. योजना चांगल्या राबवा. सरकारमध्ये असलं सुरुच असतं... सरकार येत-जात असते.

---

# ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि विद्यार्थ्यांना मेट्रो प्रवासात २५ टक्के सवलत

## » महाराष्ट्र दिनापासून या सवलतीचा लाभ घेता येणार

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

महिला सन्मान योजना आणि अमृत ज्येष्ठ योजनेमुळे एसटीमध्ये प्रवासीसंख्या वाढली. आता असाच निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई मेट्रोसाठी घेतला आहे. मुंबई मेट्रोमधून आता ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि विद्यार्थ्यांना तिकिटदरात २५ टक्के सवलत मिळणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ट्वीट करू संबंधित माहिती दिली. १ मे, म्हणजेच महाराष्ट्र दिनापासून या सवलतीचा लाभ घेता येणार आहे.

**कोणाला मिळणार लाभ?**

ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात प्रवास करता येणार आहे. नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (मुंबई वन) वापरणाऱ्या हजारो प्रवाशांना या सवलतीचा लाभ घेता येणार आहे. महामुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेड आणि एमएमआरडीए यांच्याकडून महाराष्ट्र दिनाची ही भेट मिळाली आहे. ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि दिव्यांग प्रवाशांना ४५ किंवा ६० ट्रिपसाठी मुंबई वन पासवर ही सवलत मिळणार आहे.

मुंबई मेट्रोच्या नव्या सवलतीविषयी माहिती देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, “ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि लहान मुलांच्या गरजा आणि सुरक्षितता लक्षात घेऊन आम्ही मुंबई मेट्रो नेटवर्क तयार केले आहे. त्यामुळे त्यांना या सुविधांचा जास्तीत जास्त लाभ मिळणे आवश्यक आहे.

आम्ही यापूर्वी ज्येष्ठ नागरिकांना एसटी प्रवास मोफत केला आहे तर महिलांना सुद्धा एसटी बसेसमधून ५० टक्के प्रवास सवलत दिली आहे. सामाजिक भावनेतून हे निर्णय आम्ही घेतले असून मेट्रो प्रवासातील या सवलतीमुळे देखील अधिक संख्येने लोक यातून प्रवास करतील असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

### ही कागदपत्रे द्यावी लागणार

»६५ वर्षावरील वरिष्ठ नागरिक, इयत्ता १२ वीपर्यंत शिकणारे विद्यार्थी आणि कायमस्वरूपी दिव्यांग लोकांसाठी ही सवलत आहे.या तीन श्रेणीतील प्रवाशांना सवलतीसाठी काही कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत. दिव्यांगांसाठी सरकारी/वैद्यकीय संघटनेचे प्रमाणपत्र, ज्येष्ठ नागरिकांसाठी वयाचा पुरावा आ विद्यार्थ्यांसाठी पॅन (विद्यार्थी किंवा पालक पॅन) सोबत शाळा ओळखपत्र यासारखी वैध कागदपत्रे आवश्यक आहेत.



**येथे मिळणार सवलत**

या सर्व सवलती मेट्रो लाइन २ ए आणि ७ च्या मेट्रो स्टेशनवरील कोणत्याही तिकीट खिडकीत आवश्यक कागदपत्र दिल्यावर मिळू शकतील. नवीन आणि पूर्वी खरेदी केलेल्या मुंबई-1 कार्डवर देखील सवलत असेल तसेच याला ३० दिवसांची वैधता असेल.

मुंबई 1 कार्ड रिटेल स्टोअर, पेट्रोल पंप आणि बेस्ट बस प्रवासादरम्यान देखील वापरले जाऊ शकते व रिचार्जही करता येते.

---

सांगली बाजार समितीमध्ये भाजपा पुरस्कृत पॅनेलला पराभूत करीत

# महाविकास आघाडी विजयी

।सांगली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पालकमंत्री सुरेश खाडे आणि खा. संजयकाका पाटील यांच्या नेतृत्वाखालील भाजपा पुरस्कृत पॅनेलचा धुव्वा उडवत महाविकास आघाडी पुरस्कृत पॅनेलने सांगली बाजार समितीच्या निवडणुकीत एकहाती सत्ता हस्तगत केली. तर इस्लामपूरमध्ये राष्ट्रवादी आणि विटा बाजार समितीवर शिवसेना शिंदे गट, भाजपा आणि कॉंग्रेस यांच्या संयुक्त पॅनेलने राष्ट्रवादीचा पराभव करीत सत्ता संपादन केली. तीनही बाजार समितीची सत्ता प्रस्थापित गटाकडेच कायम राहिली आहे.**

देशात सर्वाधिक उलाढाल असलेल्या सांगली बाजार समितीची सत्ता हस्तगत करण्यासाठी भाजपाने पालकमंत्री खाडे यांच्या नेतृत्वाखाली पॅनेल निवडणूक मैदानात उतरवले होते. मात्र, महाविकास आघाडीच्या एकसंघ प्रयत्नामुळे भाजपा प्रणित शेतकरी परिवर्तन पॅनेलचा पराभव करीत वसंतदादा शेतकरी पॅनेलने बाजार समितीची सत्ता कायम राखण्यात यश संपादन केले.

आ. जयंत पाटील, आ. विश्वजित कदम, आ. विक्रमसिंह सावंत, कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष विशाल पाटील, जयश्री पाटील, पृथ्वीराज पाटील आणि अजितराव घोरपडे यांच्या नेतृत्वाखाली मैदानात उतरलेल्या महाविकास आघाडीच्या पॅनेलने १८ पैकी १७ जागा जिंकल्या. व्यापारी गटातून चेंबर ऑफ कॉमर्सचे प्रशांत पाटील मजलेकर हे विजयी झाले असले तरी दुसरे उमेदवार सुशिल हडदरे हे पराभूत झाले.



# मन की बात @100!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 100 व्या ‘मन की बात’साठी भाजपाकडून जय्यत तयारी



।नवी दिल्ली महाईन्यूज।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रत्येक महिन्याच्या दर रविवारी जनतेशी ‘मन की बात’मधून संवाद साधतात. २०१४ मध्ये सत्तेत आल्यापासून त्यांनी हा नियम पाळला आहे. याच ‘मन की बात’चा उद्या, रविवारी १०० वा कार्यक्रम प्रसारित होणार आहे.**

रेडिओच्या माध्यमातून साधण्यात येणाऱ्या या संवादाचा १०० वा कार्यक्रम दणक्यात करण्याकरता भाजपाच्या सर्व नेत्यांवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यानुसार, देशासह परदेशातही एकूण ४ लाख ठिकाणी हा कार्यक्रम सार्वजनिक ठिकाणी ऐकण्याकरता नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी चोख व्यवस्था करण्यात आली आहे.

### सार्वजनिक प्रसारणासाठी चोख व्यवस्था देशासह परदेशातही एकूण 4 लाख सार्वजनिक ठिकाणी होणार कार्यक्रम

### कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळतोय...

» दुष्यंत गौतम यांनी सांगितलं की, “सत्तेत आल्यानंतर ऑक्टोबर २०१४ पासून मन की बातला ५२ भारतीय भाषा आणि ११ परदेशी भाषांमध्ये प्रसारित करण्यात येत आहे. या कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळत असून यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वावरील विश्वास वाढत असल्याची प्रतिक्रियाही भाजपा नेत्यांकडून येत आहे.”

इंडियन एक्स्प्रेसला भाजपा महासचिव दुष्यंत गौतम यांनी दिलेल्या माहितीनुसार, “परदेशासह देशभरात जवळपास ४ लाख ठिकाणी मन की बात ऐकण्याकरता नियोजन करण्यात आले आहे. सर्व खासदार, आमदार आणि अन्य सदस्य या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. भाजपाचे प्रमुख जे. पी. नड्डा हा कार्यक्रम ऐतिहासिक होण्याकरता सर्वोतोपरी प्रयत्न करत आहेत. या कार्यक्रमासाठी भाजपाच्या सर्व नेत्यांवर जबाबदारी सोपावण्यात आली आहे.”

“दुसऱ्या देशातील भारतीय राजदुतांवरही ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मन की बातचा हा कार्यक्रम राजभवनात होणार असून पद्म पुरस्कार विजेत्यांना आमंत्रित करण्यात आले आहे”, अशीही माहिती देण्यात आली.

### शाहरुखची १२ वर्षांनंतर काश्मीरला भेट



**श्रीनगर** - बॉलिवूडचा बादशहा शाहरुख खान याने कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत शुक्रवारी पुलवामाला भेट दिली. आगामी ‘डंकी’ चित्रपटाच्या एका गाण्याच्या चित्रीकरणासाठी शाहरुख काश्मीरमध्ये आला होता.

‘जब तक है जान’ या चित्रपटासाठी १२ वर्षांपूर्वी त्याने काश्मीरला भेट दिली होती. काश्मीरमध्ये आल्यानंतर तो थेट सोनमर्गला गेला. तेथील ताजवास भागात मंगळवारी गाण्याचे चित्रीकरण केले. दोन दिवसांनंतर पुढील चित्रीकरणासाठी त्याने श्रीनगर आणि पुलवामाला भेट दिली.

---

## ‘विषारी’ टीकेनंतर खरगेंविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार

।नवी दिल्ली। महाईन्यूज।



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर ‘विषारी’ टीका केल्याने काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याविरोधात भाजपने शुक्रवारी निवडणूक आयोगाकडे तक्रार नोंदविली. खरगे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची आणि त्यांना कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या प्रचारापासून प्रतिबंधित करण्याची मागणी भाजपने केली.

केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांनी सांगितले की, ‘खरगे यांची टीप्पणी केवळ जीभ घसरली नसून काँग्रेसच्या द्वेषपूर्ण राजकारणाचा भाग आहे. त्यांनी असंतोष पसरवण्याचे आणि चिथावणी देण्याचे काम केले आहे.’ भाजपने भादंविच्या कलम ४९९, ५०० आणि ५०४ अंतर्गत एफआयआर नोंदवण्याची मागणी केली आहे.

अमित शहा यांची टीका

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, काँग्रेस पक्ष आणि त्यांच्या नेत्यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे. काँग्रेसकडे मुद्द्यांचा अभाव आहे. मात्र पंतप्रधानांविरोधात जेवढे वाईट बोलाल, तेवढा त्यांना जनतेचा पाठिंबा मिळत जाईल.

‘विषकन्या’ उल्लेख

भाजप आमदार बसनगौडा पाटील यांनी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांचा उल्लेख ‘विषकन्या’ असा केला.

### मोदी आज, उद्या कर्नाटक दौऱ्यावर

» बंगळूरु : पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवार व रविवार असे दोन दिवस कर्नाटक दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते सहा जाहीर सभा घेतील, तर दोन रोड शो करणार आहेत, अशी माहिती भाजपच्या वतीने देण्यात आली. मोदी शनिवारी सकाळी दिल्लीहून विशेष विमानाने बिदर विमानतळावर जातील आणि तेथून ते हेलिकॉप्टरने बिदर जिल्ह्यातील हुमनाबाद येथे सकाळी ११ वाजता जाहीर सभेला संबोधित करतील. या सभेनंतर ते विजयपुरा येथे रवाना होतील. तिथे ते दुपारी १ वाजता एका सार्वजनिक सभेला संबोधित करतील. त्यानंतर बेळगाव जिल्ह्यातील कुडाची येथे दुपारी २.४५ वाजता ते सभा घेणार आहेत.

## स्पर्म डोनेट करत बनला ५५० मुलांचा पिता!

### न्यायालयाने घातली बंदी; डचमध्ये स्पर्म डोनेशनसाठी काही नियम आणि तरतुदी

।हेग। महाईन्यूज। प्रतिनिधी।

**हेग जिल्हा न्यायालयातील न्यायाधीशांनी स्पर्म डोनर आणि इतर पालकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या फाउंडेशनच्या माध्यमातून गर्भधारणा करुन बाळाला जन्म देणाऱ्या एका आईच्या याचिकेवर स्थगिती देण्याचा आदेश दिले आहेत. न्यायालयाच्या या निर्णयाचे याचिकाकर्त्या आईने स्वागत केले आहे. या निर्णयावर त्या म्हणाल्या की, मला आशा आहे की, या निर्णयामुळे स्पर्म डोनेशवर बंदी येईल. आपल्याच नाही तर इतर देशांमध्येही ही बंदी लागू होईल. या अन्यायाविरुद्ध आपण आपल्या मुलांच्या खांद्याला खांदा लावून त्यांचे संरक्षण केले पाहिजे.**

न्यायालयाने नमूद केले की, डच मार्गदर्शक तत्त्वांनुसार, स्पर्म डोनरला १२ मातांद्वारे जास्तीत जास्त २५ मुले जन्माला घालण्याची परवानगी आहे. पण जोनाथन जेकब मेजर स्पर्म डोनेशनच्या त्याच्या हिस्ट्रीबाबत संभाव्य पालकांशी खोटे बोलला. या प्रकरणी न्यायालयाने आपल्या लेखी निर्णयात म्हटले की, डच गोपनीयता मार्गदर्शक तत्त्वांनुसार, स्पर्म डोनरची ओळख जोनाथन एम. नावाने झाली आहे, ज्याने अनेक डच फर्टिलिटी क्लिनिक आणि एका डेन्मार्कच्या क्लिनिकला तसेच जाहिराती आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे त्याच्या संपर्कात आलेल्या इतर अनेकांना स्पर्म डोनेट केले आहेत.

या स्पर्म डोनरच्या वकिलाने सुनावणीदरम्यान न्यायालयाला सांगितले की, ज्या पालकांना गर्भधारणा करता येत नाही त्यांना जोनाथन एमला मदत करायची आहे. पण कोर्टाने यावर एका निवेदनात म्हटले आहे की, पालकांचे मन वळविण्यासाठी स्पर्म डोनर जाणूनबुजून खोटे बोलला. ४१ वर्षीय स्पर्म डोनर जोनाथन एम याने किमान १३ वेगवेगळ्या क्लिनिकमध्ये त्याचे स्पर्म डोनेट केले आहे, त्यांपैकी ११ नेदरलँड्समध्ये आहेत.

### क्लिनिकद्वारे स्पर्म डोनेट

**»याचिकाकर्त्या महिलेने म्हटले आहे की, जर तिला माहीत असते की, स्पर्म डोनर आधीच ५०० पेक्षा जास्त मुलांचा पिता बनला आहे तर तिने त्याची निवड अजिबात केली नसती. डोनरकाइंडच्या मते, स्पर्म डोनरने हॉलंड आणि परदेशात दहाहून अधिक क्लिनिकद्वारे त्यांचे स्पर्म डोनेट केले. यामुळे त्याला इतर संस्थांना स्पर्मदान केले आहे का? याची माहिती न्यायालयाला द्यावी लागेल. ही माहिती पूर्ण नसल्याचे निष्पन्न झाल्यास, त्याने उल्लेख न केलेल्या प्रत्येक स्पर्म क्लिनिकसाठी त्याला २५,००० युरोचा दंड भरावा लागेल.**



# मृणालनं विकत घेतली 2 कोटींची लक्झरी कार



बॉलीवूडच्या अनेक चित्रपटांतून ॲक्टींगचा जलवा दाखवणारी अभिनेत्री मृणाल ठाकूरने नुकतीच नवी लक्झरी कार विकत घेतलीय. मुंबईच्या एअरपोर्टवर मृणाल ठकूर तिच्या नव्या मर्सिडीज बेंज एस-क्लास 450सह झळकली. त्यानंतर तिच्या कारची चर्चा सोशल मीडियावर बघायला मिळतेय. मृणालच्या शानदार आणि पावरफुल लक्झरी सेडान कारची किंमत २ कोटी आहे. चला तर या कारचे जबदरदस्त फिचर जाणून घेऊया.एस-क्लास मर्सिडीज-बेंझची फ्लॅगशिप सेडान आहे, जी तिच्या प्रीमियम लुक आणि वैशिष्ट्यांसाठी ओळखली जाते. S - 350D हा MERCEDES BENZ S-CLASS चा बेस व्हेरिएंट आहे, जो 2925 CC, 6 सिलेंडर टर्बो-चार्ज डिझेल इंजिनद्वारे ॲस्पिरेटेड आहे. हा व्हेरिएंट 281 BHP पॉवर आणि 600 NM पीक टॉर्क जनरेट करतो.

MERCEDES BENZ S CLASS 400D मध्ये 3 लीटर टर्बो चार्ज्ड डिझेल इंजिन आहे, जे 325 BHP पावर आणि 700 NM पिक टॉर्क जनरेट करते. मर्सिडीजच्या या व्हेरिएंटला ऑटोमॅटिक ट्रांसमिशनसह लॉंच करण्यात आलंय. यात 4MATIC सिस्टिमही आहे.

# लाखो मुलींचा क्रश असणारा अंकूश मात्र 'या' अभिनेत्रीवर फिदा..

अभिनेता अंकुश चौधरी मराठीतील चॉकलेट हीरो असं म्हटल्यास काही वावगं ठरणार नाही. पन्नाशी गाठलेली अंकुश तारुण्याच्या बाबतीत अगदी आताच्या हिरोंनाही तगडी टक्कर देतो. ॲक्शन हिरो असो किंवा रोमँटिक हिरो अंकुश सगळ्याच भुमिकेत शोभूनच दिसतो. त्याने आजवर 'डबल सीट', 'दगडी चाळ', 'ती सध्या काय करते', 'धुराळा' असे अनेक चित्रपट हीट केले आहेत.आता मात्र अंकुश एका नव्याकोऱ्या भुमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. 'महाराष्ट्र शाहीर' चित्रपटात तो शाहीर साबळे यांची भुमिका साकारत आहे. महाराष्ट्र शाहीर' या चित्रपटातुन तो त्याच्या आयुष्यातील बायोपिक सिनेमा करत आहे.

त्याच्या 'महाराष्ट्र शाहीर' या चित्रपटाला प्रेक्षकांचाही चांगल्याप्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. याच निमित्ताने अंकुश चौधरीशी सकाळ मनसोक्त गप्पा मारल्या आहे. नुकतच अंकुशने सकाळ डिजिटलच्या unplugged पोडकास्टच्या निमित्ताने अनेक गोष्टींचा खुलासा केला आहे. अंकुश चौधरी हा सुरवातीपासूनच एका चॉकलेट बॉयच्या भुमिकेत दिसला आहे. त्याचे चित्रपट पाहिल्यानंतर मुली त्याच्या प्रेमात पडतात. त्याच्या चाहत्यांची संख्याही अफाट आहे. तो नेहमीच मुलींच्या मनावर राज्य करतो. मात्र त्याच्या मनावर राज्य करते ती एकच त्याची बायको अभिनेत्री दिपा परब. मात्र ज्यावेळी अंकुशला त्याच्या क्रश बद्दल विचारलं त्यावेळी त्याने याबाबत खुलासा केला.



# सोनम कपूर किंग चार्ल्स यांच्या राज्याभिषेक



किंग चार्ल्स III यांचा राज्याभिषेक सोहळा युनायटेड किंगडममधील विंडसर कॅसल येथे पार पडणार बॉलीवूड अभिनेत्री सोनम कपूर नेहमीच चर्चेत असते. सोनम बॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. 'सावंरिया' चित्रपटातून पदार्पण केलेल्या सोनमने 'निरजा', 'रांझणा', 'वीरे दी वेडिंग', 'प्रेम रतन धन पायो' या चित्रपटांतून अभिनयाचा ठसा उमटवला. सोनमचे चित्रपट जरी इतके फारसे चालले नाहीत पण तिच्या फॅशन स्टाइलमुळे ती नेहमीच चर्चेत असते. पण सध्या सोनम कपूरची वेगळ्याच कारणाने चर्चा सुरु आहे. ७ मे रोजी किंग चार्ल्स यांच्या राज्याभिषेकादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या संगीत कार्यक्रमात सोनम कपूर सहभागी होणार आहे.

ठाकरे गटाची संपत्ती शिंदे गटाला देण्याबाबतची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली, सरन्यायाधीश खडसावत म्हणाले...

या कार्यक्रमात सहभागी होणारी ती एकमेव भारतीय अभिनेत्री आहे. या कार्यक्रमात ती लिओनेल रिची, कॅटी पेरी आणि टॉम क्रूझ यांसारख्या आंतरराष्ट्रीय कलाकारांबरोबर स्टेज शेअर करणार आहे. किंग चार्ल्स III यांच्या राज्याभिषेकादरम्यान कॉमनवेल्थ व्हर्च्युअल कॉयर' सादर करण्यासाठी स्पोकन वर्ड परफॉर्मन्स देण्यासाठी सोनमला आमंत्रित करण्यात आलं आहे. किंग चार्ल्स III यांचा राज्याभिषेक सोहळा युनायटेड किंगडममधील विंडसर कॅसल येथे पार पडणार आहे. सोनम सध्या तिचा नवरा आनंद आहुजा आणि मुलगा वायुसोबत लंडनमध्ये राहते.

# सारा अली खान बिचारी तर, आशिष चंचलानी जाडा

प्रसिद्ध अभिनेता आणि समीक्षक कमाल रशीद खान उर्फ केआरके अनेकदा त्याच्या ट्वीटमधून चर्चेत अस्तप. त्याने बऱ्याच ट्वीटमधून बॉलिवूड स्टार्सची खिल्ली उडवली आहे. यामुळे तो अनेकवेळा कायद्याच्या कचाट्यातही सापडला आहे. असे असूनही केआरके अशी वादग्रस्त ट्वीट करतच असतो. सध्या त्याने बॉलिवूड अभिनेत्री सारा अली खानवर निशाणा साधला असून आपल्या ट्वीटमध्ये साराची खिल्ली उडवली आहे.

सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या केआरकेने सारा अली खानबद्दल आपल्या ट्विटमध्ये लिहिले, "बघा, वाईट वेळ कोणावरही येऊ शकते, जशी आत्ता सारा अली खानवर आली आहे! आज या बिचारीला कुणीही चित्रपटात घेत नाही त्यामुळे बिचारीने शहनाजच्या शोमध्ये भाग घेतला आणि समीक्षकही झाली. आता ती जाड्या आशिष चंचलानीबरोबर चित्रपटांचे प्रमोशनही करत आहे! बिचारीची कीव करावीशी वाटते."केआरकेचं हे ट्वीट चांगलंच व्हायरल झालं आहे. यामध्ये त्याने प्रसिद्ध युट्यूबर आशिष चंचलानीवरही अत्यंत अभद्र भाषेत टीका केली आहे. केआरकेच्या या ट्वीटवर बरीच लोक टीका करताना दिसत आहेत. याआधीही केआरके अशा बऱ्याच ट्वीटमुळे चर्चेत आला होता.

नुकत्याच आलेल्या सलमान खानच्या 'किसी का भाई किसी की जान'बद्दलही केआरकेने अशीच ट्वीट करत खूप टिंगल केली होती. हा चित्रपट ७-९ कोटींचा गल्ला करेल असं त्याने म्हंटलं होतं, तर या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर १०० कोटींहून अधिक कमाई केली. सारा अली खान सध्या आदित्य रॉय कपूरसह 'मेट्रो इन दिनों' या चित्रपटाच्या चित्रीकरणात व्यस्त आहे. हा चित्रपट ८ डिसेंबरला चित्रपटगृहात झळकेल.



# सॉल्ट-मार्शची अर्धशतकी खेळी व्यर्थ

## सनरायझर्स हैद्राबादच्या भेदक माऱ्यामुळं दिल्लीचा पराभव

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएलच्या १६ व्या हंगामातील ४० वा सामना दिल्ली कॅपिटल्स आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यात झाला. दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियममध्ये हा सामना खेळवण्यात आला. सनरायझर्स हैद्राबादने प्रथम फलंदाजी करत २० षटकात ६ विकेट्स गमावत १९७ धावांपर्यंत मजल मारत दिल्ली कॅपिटल्सला विजयासाठी तगडं आव्हान दिलं होतं. त्यानंतर मैदानात उतरलेल्या दिल्ली कॅपिटल्सच्या फलंदाजांना १९८ धावांचा पाठलाग करताना अपयश आलं.**



फिलीप सॉल्ट आणि मिचेल मार्शने धडाकेबाज फलंदाजी केली. सॉल्टने ३५ चेंडूत ५९ धावा तर मिचेल मार्शने ३९ चेंडूत ६३ धावा कुटल्या. पण त्यांना दिल्लीला विजयाच्या दिशेनं नेता आलं नाही. हैद्राबादच्या गोलंदाजांनी भेदक मारा करून दिल्लीच्या ६ फलंदाजांना बाद केलं. त्यामुळे २० षटकात दिल्लीने १८८ धावा केल्यानं सनरायझर्सचा या सामन्यात ९ धावांनी विजय झाला.

दिल्ली कॅपिटल्ससाठी मयंक मार्कंडेने दोन विकेट घेतल्या. भुवनेश्वर कुमार, होसेन, टी नटराजन आणि अभिषेक शर्माला प्रत्येकी एक विकेट घेण्यात यश आलं. सनरायझर्स हैद्राबादसाठी सलामीचा फलंदाज अभिषेक शर्मने धावांचा पाऊस पाडला. दिल्लीच्या गोलंदाजांचा समाचार घेत अभिषेकने ३६ चेंडूत १२ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीनं ६७ धावांची खेळी साकारली. अक्षर पटेलच्या गोलंदाजीवर अभिषेक बाद झाला आणि सनरायझर्सला मोठा धक्का बसला.

त्यानंतर मयंक अग्रवाल इशांत शर्माच्या गोलंदाजीवर अवघ्या ५ धावांवर झेलबाद झाला. राहुल त्रिपाठीलाही धावांचा सूर गवसला नाही. तो १० धावा करून तंबूत परतला. कर्णधार एडन मार्करमही धावांसाठी संघर्ष करत होता. त्यालाही मिचेल मार्शने ८ धावांवर असताना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. हॅरी ब्रुकला तर भोपळाही फोडता आला नाही.



पण हेन्री क्लासेन आणि अब्दुल समदने दिल्लीच्या गोलंदाजांचा धुव्वा उडवला. क्लासेनने २७ चेंडूत २ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीनं ५३ धावांची नाबाद खेळी केली. तर अब्दुल समदने २८ धावा केल्या. समदलाही मिचेल मार्शने बाद केलं. पण त्यानंतर होसेन १० चेंडूत १६ धावा करत नाबाद राहिला. दिल्लीसाठी मिचेल मार्शने अप्रतिम गोलंदाजी करत चार षटकात २७ धावा देत चार विकेट्स घेतल्या. अक्षर पटेल आणि इशांत शर्माला प्रत्येकी एक विकेट मिळाली.

---

# आंदोलनाला वेगऴ्या दिशेने घेऊन जाण्याचा प्रयत्न – बजरंग

## आंदोलनाचा वापर राजकीय फायद्यासाठी होऊ देणार नाही; कुस्तीगीरांची स्पष्टोक्ती

। नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएलच्या १६ व्या हंगामातील ३८ वा सामना लखनऊ सुपर जायंट्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात मोहालीच्या बिंद्रा स्टेडियमवर रंगला. पंजाब किंग्जने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात उतरलेल्या लखनऊच्या फलंदाजांनी पंजाबच्या गोलंदाजांचा धुव्वा उडवला.**



महिला कुस्तीगीरांना न्याय मिळवून देण्यासाठी जंतर मंतरवर धरणे आंदोलनाला बसलेल्या कुस्तीगीरांनी शनिवारी आमच्या आंदोलनाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. दुसऱ्यांदा धरणे आंदोलनाला सुरुवात केल्यावर कुस्तीगीरांनी राजकीय पक्षांनी पुढे यावे असे आवाहन केले होते. मात्र, आता कुस्तीगीर काही लोक आमच्या आंदोलनाला वेगऴ्या दिशेने घेऊन जाण्याच्या हेतूने आमच्याबरोबर आले आहेत, असे सांगितले. पण, त्यांनी कोण हे स्पष्ट केले नाही.

"आमच्या आंदोलनाचा वापर राजकीय फायद्यासाठी होऊ देणार नाही. आम्ही आंदोलन वेगऴ्या दिशेने जाऊ देणार नाही. हा लढत केवळ महिला कुस्तीगीरांचा नाही, तर भारताच्या मुलींच्या न्यायासाठीचा आहे," असे बजरंगने सांगितले. मात्र, असे कोण करत आहे असा प्रश्न केल्यावर बजरंगने काहीच उत्तर दिले नाही.

आंदोलनाला सुरुवात झाल्यापासून आतापर्यंत काँग्रेस पक्षाच्या नेत्या प्रियंका गांधी वडेरा, भूपिंदर सिंह हुडा, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, राष्ट्रीय लोक दलाचे नेते जयंत चौधरी, जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक, दिल्ली सरकारचे मंत्री आतिशी सिंग, सुर्बाह भारद्वाज अशा मोठ़्या नेत्यांनी जंतर मंतरवर आंदोलक कुस्तीगीरांची बैठक घेतली आहे. यातील काहींना विनेशने प्रसारमाध्यमांसमोरही आणले होते.

# रहाणेची कसोटी संघातील निवड योग्यच; शास्त्री

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणेला जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) अंतिम लढतीसाठी भारतीय संघात स्थान देण्याचा निवड समितीचा निर्णय योग्यच आहे, असे मत माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी व्यक्त केले. श्रेयस अय्यरच्या पाठीला दुखापत झाल्यानंतर रहाणेची निवड करण्यावाचून भारताकडे पर्याय नव्हता, असे शास्त्री म्हणाले.'डब्ल्यूटीसी' अंतिम सामना लंडन येथील ओव्हल मैदानावर ७ ते ११ जून या कालावधीत होणार आहे. या सामन्यासाठी १५ सदस्यीय भारतीय संघात रहाणेचा समावेश करण्यात आला आहे. रहाणे जानेवारी २०२२ पासून भारतीय संघाच्या बाहेर होता. परंतु त्याने रणजी करंडक आणि त्यानंतर सध्या सुरू असलेल्या 'आयपीएल'मध्ये चमक दाखवली आहे. त्याने 'आयपीएल'मध्ये सहा सामन्यांत १८९.८३च्या सरासरीने २२४ धावा केल्या आहेत. यात मुंबई इंडियन्सविरुद्ध २७ चेंडूंत ६१ धावा व कोलकाता नाइट रायडर्सविरुद्ध २९ चेंडूंत नाबाद ७१ धावांच्या खेळीचा समावेश आहे.

"रहाणेचे भारतीय संघात पुनरागमन झाले याचा मला खूप आनंद आहे. त्याने 'आयपीएल'च्या दोन-तीन सामन्यांत उत्कृष्ट फलंदाजी केली. त्याच्या गाठीशी खूप अनुभव आहे, हे विसरून चालणार नाही. त्यामुळे श्रेयसला दुखापत झाल्यानंतर रहाणेचा विचार करण्यावाचून निवड समितीकडे पर्याय नव्हता," असे शास्त्री म्हणाले."एका सामन्याच्या निकालावर विजेता ठरणार असतो, तेव्हा तुम्हाला अनुभवी खेळाडूंची आवश्यकता असते.